# <u>प्रेसनोट</u>

दि. २१/०६/२०२४

## सहकारी बँक, शिक्रापुर शाखा, ता. शिरुर, जि. पुणे येथील वसुली अधिका-यावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. गु. र.नं. ५७३/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय – ४२ वर्षे |
| फिर्यादी | श्रीमती. विजयमाला पवार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| आरोपी नाव व कार्यालय | राजाराम मारुती डेरे, वसुली अधिकारी, शरद सहकारी बँक लि. शिक्रापुर शाखा, ता. शिरुर, जि. पुणे. (इ.लो.से) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,२८,०००/- रुपये (तीन लाख अठ्ठाविस हजार रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २,२८,०००/- रुपये (दोन लाख अठ्ठाविस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १२/०३/२०२४ रोजी |
| गुन्हा दाखल दिनांक | दि. २१/०६/२०२४ रोजी |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सन २०१३ मध्ये त्याचे मित्रासाठी शरद सहकारी बँक, शाखा शिक्रापुर येथील ०३ कोटी रुपयाच्या कर्ज प्रकरणास जामीनदार राहीले होते. सदर कर्जाची रक्कम थकल्याने अपर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वसुली अधिकारी राजाराम डेरे यांची नियुक्ती केली होती. कर्जदार हे रक्कम भरण्यास अपात्र झाल्याने कर्जदार व जामीनदाराविरुद्ध विविध केसेस दावे दाखल केले होते. तक्रारदार यांनी जामीनदार म्हणून नैतिक जबाबदारी स्विकारुन मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल करुन उर्वरित कर्जाची सर्व रक्कम जामीनदार या नात्याने कर्ज खात्यात भरली व कर्ज बाकी नसल्याचा बँकेकडून दाखला घेतला. तक्रारदार यांनी बँकेच्या संचालक मंडळास कर्ज वसुलीच्या दरम्यान लावलेल्या सर्व केसेस मागे घेणेबाबत विनंती अर्ज केला होता. त्यास शरद सहकारी बँक, शाखा शिक्रापुर यांनी मान्यता दिली व तसा आदेश बँकेने वसुली अधिकारी राजाराम डेरे यांना दिला होता. त्याबाबत तक्रारदार हे वसुली अधिकारी राजाराम डेरे यांचेकडे पाठपुरावा करीत होते. लोकसेवक राजाराम डेरे, वसुली अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे थकीत कर्ज प्रकरणी दाखल केलेल्या सर्व केसेस मागे घेणेकरीता ५ लाख रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक राजाराम डेरे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेविरुध्द कर्ज प्रकरणी दाखल असलेल्या सर्व केसेस मागे घेण्याकरीता कर्जाच्या प्रिन्सीपल रक्कमेच्या १ टक्के म्हणजेच तीन लाख अठ्ठाविस हजार रुपयांची लाच मागणी करुन, तडजोडीअंती २,२१,०००/- (दोन लाख एकविस हजार रुपये) रुपयांची लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.